CMYK

सिंदखेडराजा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन
>> पान 2

मला जेलमध्ये टाकण्याचे प्रयत्न झाले
>> पान 3

माकडाच्या टोळीमुळे ढाणकी नागरिकांत भीती!; वनविभाग खात बनलं नाममात्र!
>> पान 4

सुविचार

सत्याच्या मार्गावर चालणारे नेहमी विजय मिळवतात.

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



मला आयुष्यात ही संधी कधीच मिळाली नाही : गौतमी पाटील
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 131 ■ रविवार, दि. 22 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# शिंदेंकडे नगर विकास, गृहनिर्माण; अजित पवार अर्थमंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह कायम

## खाते वाटपात धक्कातंत्राचा अवलंब



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** देवेंद्र फडणवीस सरकारचे खाते वाटप जाहीर झाले असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकास आणि गृहनिर्माण, तर अजित पवारांकडे अर्थ खाते देण्यात आले आहे. गृह मंत्रालयासह ऊर्जा, विधी आणि न्याय, सामान्य प्रशासन, तसेच माहिती आणि जनसंपर्क विभाग हे विभाग मुख्यमंत्र्यांनी स्वतःकडे ठेवले आहेत.

दि. १५ डिसेंबर रोजी नागपूर येथील राजभवनात महायुतीच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. यात ३३ कॅबिनेट आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. मुख्यमंत्री आणि २ उपमुख्यमंत्र्यांसह मंत्रिमंडळातील सदस्य संख्या ४२ झाली आहे. फडणवीस सरकारमध्ये भाजपच्या १९, शिवसेनेच्या ११ आणि राष्ट्रवादीच्या कोट्यातील ९ मंत्र्यांचा समावेश आहे.

## कुणाला कुठले खाते मिळाले

देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) – गृह, ऊर्जा, विधी आणि न्याय, सामान्य प्रशासन, माहिती आणि जनसंपर्क, तसेच कोणत्याही मंत्र्यांकडे न दिलेले विभाग
एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री) – नगर विकास, गृह निर्माण
अजित पवार (उपमुख्यमंत्री) – अर्थ
चंद्रशेखर बावनकुळे – महसूल
राधाकृष्ण विखे पाटील – जलसंधारण ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास)
हसन मुश्रीफ – वैद्यकीय शिक्षण
चंद्रकांत पाटील – उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाज मंत्री
गिरीश महाजन – जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन
गुलाबराव पाटील – पाणीपुरवठा
गणेश नाईक – वन मंत्रालय
दादाजी भुसे – शालेय शिक्षण
संजय राठोड – मृद व जलसंधारण
धनंजय मुंडे – अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण
मंगलप्रभात लोढा – कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता
उदय सामंत – उद्योग, मराठी भाषा विभाग
जयकुमार रावल – पणन, राजशिष्टाचार
पंकजा मुंडे – पर्यावरण आणि वातावरणीय बदल, पशुसंवर्धन
अतुल सावे – ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नवीनीकरण
अशोक उईके – आदिवासी विकास
शंभूराज देसाई – पर्यटन, खनिकर्म आणि स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय
आशिष शेलार – माहिती आणि तंत्रज्ञान, सांस्कृतिक
दत्तात्रय भरणे – क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ
अदिती तटकरे – महिला आणि बालविकास

>> पान २

## बहिणीसोबत बोलला म्हणून कोयत्याने केली हत्या

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** बारामती येथे आत्येबहिणी सोबत बोलण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका युवकाचा धारदार कोयत्याने हल्ला करुन निर्घृण हत्या करण्यात आली होती. या खून प्रकरणातील तिन्ही आरोपींना पोलिसांनी अवघ्या १३ तासात अटक केली आहे.

बारामती शहरातील प्रगतीनगर परिसरातील क्रिएटिव्ह अकॅडमी कडून टीसी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर १९ डिसेंबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास एका युवकाचा धारदार कोयत्याने जीव घेणा हल्ला करून खून करण्यात आला होता. यात अनिकेत सदाशिव गजाकस (वय, २३ रा. देसाई इस्टेट बारामती) या २३ वर्षीय युवकाचा खून झाला होता. या प्रकरणातील नंदकिशोर पंजाबराव अंभोरे, (रा शेळके वस्ती तांदुळवाडी, बारामती) महेश नंदकुमार खंडाळे (रा. यदुपाटील नगर, तांदुळवाडी, बारामती), संग्राम दत्तात्रेय खंडाळे (रा. शेळकेवस्ती, तांदुळवाडी, बारामती) यांना पोलिसांनी १३ तासांत अटक केली आहे.

घटनेची अधिक माहिती अशी की, मयत अनिकेत व आरोपींमध्ये याआधीही आपापसात वाद झाले होते. मयत अनिकेत हा आरोपी नंदकिशोर अंभोरे याच्या आत्येबहिणी सोबत बोलण्याच्या कारणावरून वाद झाला होता. याचाच बदला घेण्यासाठी वरील तीनही आरोपींनी १९ डिसेंबरच्या रात्री दहाच्या सुमारास दुचाकीवरून येत अनिकेत याच्यावर कोयत्याने हल्ला चढवत ठार केले.

## विरोधकांना फक्त विरोधी भूमिका मांडायची असते आम्ही मार्ग काढायला आलो- अजित पवार



दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** सोमनाथ सूर्यवंशी कुटुंब भेट– सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांना भेटायला आलो आहे अधिवेशन सुरू होते, आज संपलं आणि आम्ही आलो बीड येथे दुःखद हत्या झाली, तेथे त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल न्यायालयीन चौकशी आणि उच्च चौकशी होणार असं मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले परभणीची घटना ही दुःखद आहे, त्यांच्या कुटुंबियांचा म्हणणं ऐकून घेतले.सोमनाथचे कुटुंब लातूर जिल्ह्यातील आहे, मात्र वडार समाजातील असल्यामुळे कामासाठी ते वेगवेळ्या ठिकाणी जातात वडील गेल्यावर मोठा म्हणून सोमनाथवर सगळी जबाबदारी आली सोमनाथने शिक्षणात चांगले यश संपादन केले होते. त्यांचे लहान भाऊ चांगले शिकले आहेत– लहान भाऊ अविनाश याला शासकीय सेवेत नोकरी मिळावी अशी त्यांची विनंती आहे फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवावा अशी त्यांची मागणी आह – मवेजा वाढवून देण्याची मागणी आहे.आम्हाला ही कळते प्रत्येकाने राज्यकर्ते म्हणून काम केले आहे आलो नसतो तर म्हणाले असते आम्ही भेटी दिल्या पण सरकारच्यावतीने कोणी आले नाही विरोधकांना फक्त विरोधी भूमिका मांडायची असते आम्ही मार्ग काढायला आलो आहोत. दुपार पर्यंत अधिवेशन सुरू होते त्यामुळे यायला उशीर झाला– जिथपर्यंत येत होतं तिथपर्यंत हेलिकॉप्टरने आलो आणि त्यानंतर बायरोडने आलो

## संजय राऊतांच्या घराची रेकी करणारे दोन्ही इसम टॉवर ची रेंज तपासण्यास आल्याचे पोलिस तपासात सिद्ध

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि आमदार सुनिल राऊत यांच्या मैत्री बंगल्यासमोर काल रेकी झाल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र हे दोघे संशयित मोबाईल टॉवर ची रेंज तपासण्यास आल्याचे तपासात सिद्ध झाले आहे. सकाळी ०९.१५ वाजाताचे सुमारास दोन संशयीत इसम मोटार सायकलवर राऊत यांच्या घराची रेकी केल्याची तक्रार पोलिसांकडे देण्यात आली होती. या तक्रारीवरुन मुंबई पोलीसांनी चौकशी चालू करुन या घटनेची सखोल तपास केला असता यामध्ये आढळलेले चार इसम हे सेल प्लॅन व इन्स्टा आयसीटी सोल्युशन या कंपनीचे कर्मचारी असून ते ईरिक्सन कंपनीकडून जीओ मोबाईल नेटवर्कचे नेटटेस्ट ड्रायव्ह करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी या तपासासाठी आठ पथके तयार केली होती. सीसीटीव्ही च्या आधारे या संशियतांचा शोध घेऊन त्यांना ठाणे कापूरबावडी परिसरातून ताब्यात घेण्यात आले असता हा याचा खुलासा झाला असून संबधीत कंपनीकडून खात्री पोलिसांकडून करण्यात आली असल्याची माहिती परिमंडळ सात चे उपायुक्त विजयकांत सागर यांनी दिली आहे.

# शरद पवारांनी मस्साजोगमध्ये पाऊल ठेवताच धनंजय मुंडेंच्या अडचणी वाढल्या

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज (शनिवारी) या गावात जाऊन देशमुख कुटुंबीय आणि गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी मस्साजोगच्या गावकऱ्यांनी शरद पवार यांच्यासमोर आक्रोश केला. यावेळी शरद पवारांसमोर जमलेल्या गावकऱ्यांनी धनंजय म ुंडेंचां राजीनामा घेतला पाहिजे अशी मागणी केली आहे. यावेळी शरद पवारांसमोर गावकऱ्यांचा आक्रोश केला. आम्ही सगळे भयभीत आहोत. आम्हाला उद्या कुणाचा नंबर लागेल याचा नेम राहिला नाही, अशी भीती देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली आहे.



शरद पवारांनी संतोष देशमुख यांच्या हत्येचा सर्व घटनाक्रम कुटुंबियांकडून समजून घेतला. शरद पवारांनी मृत संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांचं सात्वन केलं. यावेळी संतोष देशमुख यांचे कुटुंबीय शरद पवारांपुढे भावूक झाल्याचं पाहायला मिळालं. शरद पावरांसमोर गावकऱ्यांचा आक्रोश पाहायला मिळाला. आम्ही सगळे भयभीत आहोत. उद्या कुणाचा नंबर लागेल, याचा नेम राहिला नाही, असं गावकरी म्हणाले. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला पाहिजे, अशी मागणीही गावकऱ्यांनी केली.

पोलिसांनी आम्हाला मृतदेह कुठे मिळाला, त्याबाबत खोटे सांगितले. माझ्या भावाला न्याय मिळायला हवा, जो कोणी या हत्येमागे सूत्रधार आहे, त्यालाही अशीच शिक्षा झाली पाहिजे. आम्हाला काहीच नको, आम्हाला फक्त न्याय हवाय, अशी प्रतिक्रिया संतोष देशमुख यांच्या बहिणीने शरद पवारांपुढे दिली.

जे घडले आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना धक्का बसला. महाराष्ट्राच्या साखर उद्योगाला हातभार लावणार लोक इथे आहेत. अशा जिल्ह्यात जे घडले ते कुणाला ही न पटणारे आहे. सरपंचाची हत्या झाली. जे घडले ज्यात काहीच संबंध नसताना यांची हत्या झाली. हे चित्र अतिषय गंभीर आहे. याची नोंद राज्य आणि केंद्र सरकारने घ्यावी. जे घडले आहे, त्यामुळे सर्वसामान्य लोकांना धक्का बसला. महाराष्ट्राच्या साखर उद्योगाला हातभार लावणार लोक इथे आहेत. जितेंद्र आव्हाड यांनी सुधा हा प्रश्न विधानभवनात मांडला. ते कोणत्या जातीचे आहेत, समाजाचे आहेत हे त्यांनी बघितले नाही. कृपा करा आणि दहशत कमी करण्यासाठी प्रयत्न करा, असं शरद पवार यावेळी म्हणाले.

## महाराष्ट्रात ३०३ मोठे प्रकल्प, २ लाख १३०० हजार रोजगार; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठी घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या काही वर्षात २ लाख १३०० हजार जणांना रोजगार मिळणार असल्याची मोठी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. १ जुैले २०२२ पासून महाराष्ट्रा २२१ विशाल आणि अतिविशाल प्रकल्प सुरु आहेत. यात ३ लाख ४८ हजार कोटी गुंतववणूक त्यात करण्यात आली आहे. यासह ३०३ प्रककल्पांचा विकास करण्यात येतोय. त्यापैकी ९५ प्रकल्प सुरु झालेत. विदर्भ तसेच मराठवाड्यात अनेक बडे उद्योजक गुंकवणूक करणार आहेत. २०२२ ते २०२४ या वर्षात महाराष्ट्रात २ लाख ४४ हजार कोटींची परकीय गुंतवणूक झालेली आहे. आपल्या राज्यातील उद्योग दुसऱ्या राज्यात गेल्याचा आरोप विरोधर करतात. त्यांनी ही आकडेवारी पहावी असा टोला एकनाथ शिंदे यांनी लगावला.

महाविकास आघाडीचे गृहमंत्री वलसुलीच्या आरोपाखाली जेलमध्ये गेले. पोलिस आणि उद्योगपतींच्या घराबाहेर बॉम्ब लावले. आता कादाय आणि सुववस्येखेच्या नावाने गळा काढताता. महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात पोलिस यंत्रणेचा गैरवापर केला गेला. मला आणि देवेंद्र फडणवीस यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी पोलिसांना हाताशी घेऊन कट रचले. महाविकासआघाडीला कायदा आणि सुव्यवस्थेबाबत बोलण्याचा नैतिक अधिकार नाही. पेनड्राईव्हमध्ये सर्व पुरावे आहेत. गुन्हेगारांना अभय दिला जाणार नाही.

# नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात ६ दिवसांत काय झाले?; बीड, परभणी, दिल्लीसह अनेक मुद्द्यांनी लक्ष वेधले


दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यातील महायुती सरकारच्या हिवाळी अधिवेशनाची सांगता आज होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्यातील मंत्रिमंडळ विस्तार झाला. मात्र, मंर्त्यांचे खातेवाटप अद्यापही झाले नाही. त्यामुळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच अधिवेशनात आमदार व विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यानंतर, आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं भाषण होणार आहे. नागपूरमधील सहा दिवसांच्या अधिवेशनात सर्वाधिक चर्चाही बीड आणि परभणी घटनेवर झाली कायदा सुव्यवस्था संदर्भात पहिल्या दिवशीच सोमवारपासून विरोधकांनी सभागृहाच्या बाहेर आंदोलनाला सुरुवात केली होती बीड परभणी घटनेवरती अनेकदा सभागृहाच्या बाहेर आंदोलन झाली आणि सभागृहात १०१ अन्वे चर्चा करून आणली. या चर्चेवरती भाजपचे आमदार सुरेश धस आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी गंभीर आरोप करत वाल्मीक कराड आणि एक मंत्री म्हणून धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला. तर, परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणावरुनही सभागृहात गदारोळ पाहायला मिळाला.

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी थेट सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव घेत हल्लाबोल केला. त्यानंतर मुख्यमंर्त्यानी यावरती उत्तर देताना बीड प्रकरणांमध्ये एसपींची बदली केली आणि न्यायालय आणि आयजी अंतर्गत चौकशी समिती गठित केल्याची घोषणा केली. परभणी प्रकरणावरही चौकशी समिती गठीत केली, या दोन ही घटनांमध्ये मृतांच्या नातेवाईकांना अर्थिक मदतीची घोषणा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात अमित शहा यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्यानंतर सभागृहात त्याचे पडसाद उमटले, विरोधकांनी निषेध व्यक्त करत आंदोलन केले. नागपूरच्या संविधान चौकामध्ये मोर्चा काढत विधानभवनातही सर्व विरोधकांनी जय भीमचा नारा देत मोठ आंदोलन पायऱ्यांवरती केले.

विदर्भावर चर्चा झालीच नाही

कापसाला योग्य भाव नाही म्हणून एक दिवस सहभागृच्या बाहेर विरोधकांनी पायऱ्यावरती आंदोलन केले. अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करतांना पीक विमा संदर्भात सुरेश धस यांनी महायुतीला घरचा आहेर देत तत्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर अप्रत्यक्षरीत्या टीका केली. काही महत्त्वाची विधेयक मांडली गेली, त्यामध्ये जन सुरक्षा विधेयक यावरती चर्चा करण्यात आली. कारगृह सुधारणा विधेयक मांडण्यात आलं. ही सर्व चर्चा झाली असली तरी विदर्भात अधिवेशन होत असताना विदर्भावरती मात्र वेगळी चर्चा करण्यात आली नाही. अंतिम आठवडा प्रस्तावमध्ये विदर्भ संदर्भात अवघ्या दोन ओळींचा उल्लेख करण्यात आला आहे.



या अधिवेशनामध्ये सर्वाधिक बोलायला नवीन आमदारांना संधी देण्यात आली. नवीन आमदारांनी सर्वाधिक औचित्याच्या मुद्द्यावरती प्रश्न उपस्थित केले. सोबतच राज्यपालांचे अभिभाषण आणि २९३ च्या अन्वेय चर्चावरती आपली मत मांडली. बीड व परभणीच्या आमदारांनी आपली भूमिका सर्वाधिक मांडली.

CMYK

# सिंदखेडराजा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा** : सिंदखेडराजा येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ५२ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. विज्ञान शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष दीपक नागरे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली यासंदर्भात काल दि. २० डिसेंबर, शुक्रवारी पूर्व नियोजन बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षण अधिकारी भास्कर वाघमारे तर महाविद्यालयाचे प्राचार्य रामप्रसाद ठाकरे, विषयतज्ञ प्रवीण गवई, दिलीप काकडे आदि प्रमुख उपस्थितीत होते. याप्रसंगी गटशिक्षण अधिकारी भास्कर वाघमारे यांनी या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीमध्ये सर्वच शाळांतील विद्यार्थी, विज्ञान शिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक व परिचर आदिंनी सहभागी होण्याचे आवाहन केले. यामध्ये प्रामुख्याने



तालुक्यातील शाळांमधील ६ वी ते ८ वी व ९ ते १२ वीच्या विज्ञान शिक्षकांनी पुढाकार घेवुन विद्यार्थ्यांना सहभागी करावे तसेच शिक्षकांनी स्वतः शैक्षणिक साहित्य तसेच संकल्पना स्पष्ट करणारी विविध उपकरणे तयार करुन प्रदर्शनात सहभागी होण्याचे निर्देश दिले. मार्गदर्शनपर भाषणात विज्ञान शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष दीपक नागरे यांनी आपली उपकरणे ही सर्वसामान्य नागरिकांना कशी फायदेशीर होवू शकतील असा प्रयत्न झाला पाहिजे असेही स्पष्ट केले.

बैठकीतील नाविन्यपूर्ण कल्पनांचे स्वागत करीत, विज्ञान प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी तालुक्यातील सर्व विज्ञान शिक्षकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. विज्ञान प्रदर्शनीच्या दोन दिवसीय कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार मनोज नंदाताई देवानंद कायंदे, शाळा संस्थेचे अध्यक्ष भागोजी पुंजाजी तायडे, सचिव त्र्यंबकराव म्हातारजी ठाकरे व संचालक मंडळ तसेच शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर या दरम्यान विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी वजने व मापे अधिकारी वैभव अलका भानुदास लव्हाळे हे मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीला प्राचार्य उध्दव दराडे, सुचिता इठोळे, एम. एस. गीते, श्रीराम भोसले, वैशाली सरोदे, अश्र्विनी मेहेत्रे, अशोक जायभाये, भानुदास लव्हाळे, श्रीधर जायभाये, एस. टी. तायडे, गैबीनंद घुगे, गजानन काळे, रामदास सानप, सुहास भावसार, संदीप फड, बैठकीचे संचलन अशोक तायडे व आभार प्रदर्शन सतीश तिडके यांनी केले.

ह्या वेळच्या प्रदर्शनीत मुख्य विषय शाश्र्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान हा असुन अन्न ,आरोग्य आणि स्वच्छता, वाहतूक आणि दळणवळण, नैसर्गिक शेती, आपत्ती व्यवस्थापन, गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार, कचरा व्यवस्थापन, संसाधन व्यवस्थापन हे उपविषय आहेत. तसेच निबंध स्पर्धेचे विषय प्राथमिक गट वर्ग ६ ते ८ साठी पाणी समस्या व उपाय, सौर ऊर्जेचा वापर कसा वाढवावा, कडधान्यांचे आहारातील महत्त्व, तर माध्यमिक गट वर्ग ९ ते १२ साठी मानव – वन्यप्राणी संघर्ष, घनकचरा व्यवस्थापन, नदीजोड प्रकल्प हे आहेत.

## धोकादायक ऊस वाहतूकीला शिस्त लावा

उसाच्या ट्रॅक्टर ला धडकून अपघात झाला अशी बातमी हल्ली कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. यावर्षी अशा अपघातात जीवितहानी झाल्याची बातमी अद्याप वाचायला मिळाली नसली तरी या आधी अशा अपघातात अनेक जणांना जीव गमवावा लागला आहे. मागील वर्षी दौंडमध्ये झालेल्या अपघातात तीन तरुण मुलांना अशा अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे. काष्टी तालुका श्रीगोंदा येथील पंचविशीतील तीन तरुणांची दुचाकी उसाच्या ट्रॅक्टरला धडकली कारण उसाच्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर बसविण्यात आले नव्हते. रिफ्लेक्टर नसल्याने या तरुणांना उसाचा ट्रॅक्टर दिसला नाही त्यामुळे अपघात झाला आणि त्यात निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागला होता. सातत्याने असे अपघात होऊनही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही. सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात दोन ते तीन कारखाने आहेत. त्यामुळे ऊस तोड करून उसाची वाहतूक जोमात सुरू आहे मात्र त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनांच्या पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत. ऊस वाहतूक करताना क्षमतेपेक्षा अधिक उसाची वाहतूक केली जात आहे. ट्रॅक्टर चालक दोन ट्रॉली एकमेकांना जोडून ऊस वाहतूक करतात त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना फक्त ट्रॅक्टर दिसतो परंतु त्या ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ गेल्यावर त्या ट्रॉली दिसतात मग घाई गडबडीत वाहन चालकांची अपघात रोखणयासाठी धांदल उडते. ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांना रिफ्लेक्टर, रेडियम तसेच टेल लॅम्प नसल्याने रात्री अनेक वाहन चालकांना पुढे ऊस वाहतूक करणारे वाहन आहे याचा अंदाज येत नाही त्यामुळेही अपघात होतात. ऊस वाहतूक करणारे वाहन चालक वाहन रस्त्याच्या मध्येच थांबवतात त्यामुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळते. अनेक वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतो. काही वाहनांवर तर चक्क अल्पवयीन चालक असतात. ऊस वाहतूक करणारे सर्वच चालक मोठ्या आवाजात स्पीकरवर गाणी लावतात त्यामुळे लक्ष तर विचलित होतेच पण ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडले याचा वाहन चालकाला अंदाज देखील येत नाही. मोठ्या आवाजतील गाण्यांमुळे इतर वाहनांच्या हॉर्नचा आवाज वाहन चालकांना येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालू असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याच्या कडेवरील गावातील लोकांची झोपमोड होते. अंधारात बैल गाडीने देखील ऊस कारखान्यात नेला जाते. उसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना दिसत नाही त्यामुळे देखील अपघात होतात. यापुढे तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये यासाठी आरटीओ प्रशासनाने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी नियमावली तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत म्हणजे धोकेदायकपणे सुरू असलेल्या या ऊस वाहतुकीला शिस्त लागेल आणि लोकांच्या जिविताशी चालणारा खेळ थांबेल.

पान १ वरून...

## कुणाला कुठले खाते मिळाले

शिवेंद्रराजे भोसले – सार्वजनिक बांधकाम
माणिकराव कोकाटे – कृषी
जयकुमार गोरे – ग्रामविकास, पंचायत राज
नरहरी झिरवाळ – अन्न आणि औषध प्रशासन
संजय सावकारे – वस्त्रोद्योग
संजय शिरसाट – सामाजिक न्याय
प्रताप सरनाईक – परिवहन
भरत गोगावले – रोजगार हमी, फलोत्पादन, मिठागरे आणि पाणथळ जमीन विकास
मकरंद पाटील – मदत आणि पुनर्वसन
नितेश राणे – मत्स्यव्यवसाय, बंदरे
आकाश फुंडकर – कामगार
बाबासाहेब पाटील – सहकार
प्रकाश आबिटकर – सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण

राज्यमंत्री

माधुरी मिसाळ – नगर विकास, वाहतूक, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ
आशिष जयस्वाल – अर्थ आणि नियोजन, कृषी,
मदत आणि पुनर्वसन, विधी आणि न्याय, कामगार
मेघना बोर्डीकर – सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण. पाणी पुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला आणि बालविकास,
सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)
इंद्रनील नाईक – उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च आणि
तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृद आणि जलसंधारण
योगेश कदम – गृह (शहरी), महसूल, ग्राम विकास आणि पंचायती राज,
अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन
पंकज भोयर – गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म

# मला आयुष्यात ही संधी कधीच मिळाली नाही : गौतमी पाटील

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** :डान्सर गौतमी पाटील ही सध्या महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात प्रसिद्ध झाली आहे. गौतमी पाटील सोशल मीडियावर ट्रेंडिग लिस्टमध्ये असते. गौतमी डान्सच्या कार्यक्रमांशिवाय अनेक ठिकाणी उपस्थिती लावत असते. सध्या पुण्यात पुणे पुस्तक महोत्सवाची जोरदार चर्चा आहे. या पुस्तक महोत्सवाला गौतमी पाटील हिला आमंत्रण देण्यात आलं आहे. गौतमी पाटील पुण्यातील पुस्तक महोत्सवाला हजेरी लावली.



पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजच्या कॅम्पसमध्ये पुणे पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. गौतमी पाटील याठिकाणी नाचणारा का असं सर्वांना वाटलं होतं. पण नेहमीच नाचणारी गौतमी यावेळी हातात पुस्तक घेऊन वाचताना दिसली. अभिनेत्री दिग्दर्शक प्रवीण तरडे यांनी गौतमी पाटीलला पुस्तक भेट दिली.

पुणे पुस्तक महोत्सवात बोलताना गौतमी म्हणाली, मला इतर ठिकाणी नाचायला बोलवतात पण इकडे पुस्तक वाचायला बोलावलं. पुण्यात एवढा मोठा पुस्तक महोत्सव भरला आहे मला यापुढे मोकळा वेळ मिळाला तर मी पुस्तक वाचणार आहे.

गौतमी पुढे म्हणाली, पुस्तक महोत्सवाला आल्यामुळे मला चालना मिळेल वळण मिळेल. मला लहानपणापासून डान्स करत होते पण आता नक्की पुस्तक वाचेन. सर्वांनी पुस्तक वाचा. मला पुस्तक वाचण्याची संधी मिळाली नाही पण इथून पुढे नक्की पुस्तक वाचणार आहे.

गौतमीने प्रवीण तरडे यांचे आभार मानले. गौतमी म्हणाली, प्रवीण दादा सुचवलेले शिवाजी महाराज यांचे पुस्तक मी वाचणार आहे. मला प्रवीण तरडे आता पुस्तक निवडून देणार आहेत त्यांनी मला या ठिकाणी बोलावलं त्याबद्दल आभार. तर प्रवीण तरडे म्हणाले, मी 'फकिरा' अण्णाभाऊ साठे यांचे पुस्तक भेट देणारा आहे.

## बीडची कायदा सुव्यवस्था सरळ करणार, कोण आहेत नवनीत कांवत?

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण सध्या चांगलंच तापल्याचं दिसून येत आहे. बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह महाविकास आघाडीच्या खासदारांनी संसदेत तर विरोधी पक्षांच्या आमदारांनी विधीमंडळात या प्रकरणी आज उठवला आहे. या प्रकरणी सभागृहात झालेल्या चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस प्रशासनाने कारवाई करण्यात कुचराई केल्याचे सांगितले होते. तसेच बीडच्या पोलीस अधीक्षकांची बदल करण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा देखील त्यांनी केली होती. या घोषणेला २४ तास उलटत नाही तोच पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी नवनीत कांवत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.












DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### पुणे पुस्तक महोत्सवानिमित्त पुस्तकरुपी संविधान प्रतिकृती बनवत केला विश्वविक्रम



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे पुस्तक महोत्सवाच्या पूर्वसंध्येला पुस्तकांचा वापर करून पुस्तक रुपी संविधान प्रतिकृती बनवत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करण्यात आला आहे. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवा निमित्त गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करण्यात आलं आहे. पुस्तक महोत्सवात संविधानाचा सन्मान करण्यासाठी आज हा सातवा वर्ल्ड रेकॉर्ड करण्यात आला. ९७ हजार २० पुस्तकांपासून पुस्तकरुपी संविधान प्रतिकृती बनवण्यात आली आहे. १ लाख पुस्तकांचं बनवलेलं हे पहिलं स्ट्रक्चर असल्याचे पुस्तक महोत्सवाचे आयोजक राजेश पांडे यांनी यावेळीसांगितले आहे.

### बाळासाहेब थोरातांचे संगमनेरात आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर मध्ये आंदोलन छेडले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर केलेल्या वक्तव्याच्या विरोधात बाळासाहेब थोरात आक्रमक झाले आहेत. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीतील मृत्यूच्या निषेध नोंदवण्यासाठी थोरात व त्यांच्या कार्यकर्त्यांनी संगमनेरच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात आंदोलन केलंय. तसेच बीडचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्याप्रकरणी देखील त्यांनी सवाल उपस्थित केले आहेत.

### भुजबळांच्या मतदारसंघात माणिकराव कोकाटे यांना शुभेच्छा देणारे बॅनर; येवल्यात चर्चांना उधाण




दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे आमदार छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात डावलल्यामुळे छगन भुजबळ व भुजबळ समर्थक प्रचंड नाराज आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे सिन्नरचे आमदार माणिक कोकाटे यांची कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लागली आहे. दरम्यान सिन्नरच्या माणिकराव कोकाटे यांच्या शुभेच्छांचे फलक भुजबळांचा येवला मतदार संघात लागल्याने चर्चांना उधाण आले असून भुजबळांना डीवचाऱ्यासाठी हे बॅनर तर लावण्यात आले नाही ना अशा चर्चांना उधाण आले आहे.

### चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या परीक्षेत गोंधळ; विद्यार्थ्यांनी परीक्षेवर टाकला बहिष्कार



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यात सुरु असलेल्या चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या परीक्षेत गोंधळ झाल्याचं पहायला मिळाले. आज जालन्यातल्या डीजीपी कॅम्पसमध्ये चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचा पेपर होता. त्यासाठी वेगवेगळ्या भागातून विद्यार्थी पहाटे परिक्षा केंद्रावर पोहोचले. सकाळी ८ वाजता हा पेपर सुरु झाला मात्र एका प्रश्नाच्या उत्तरावर क्लीक केलं की दुसरा पर्याय निवडला जात होता. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेवर बहिष्कार टाकला असून ही परीक्षा पुन्हा नव्याने घेण्याची मागणी केली आहे.

# मला जेलमध्ये टाकण्याचे प्रयत्न झाले

## बीड, परभणीसह एकनाथ शिंदेंची तुफान फटकेबाजी,ठाकरेंना शायरीतून टोला

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या नागपूरमधील हिवाळी अधिवेशनाची आज सांगता होत असून अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषद सभागृहात बोलताना चौफेर फटकेबाजी केली. बीड, परभणी, नक्षलवादाच्या मुद्द्यांसह विरोधकांनाही लक्ष्य केलं. आपल्या भाषणाची सुरुवात करतानाच त्यांनी शायरीतून ठाकरेंवर निशाणा साधला. तुफानों मे कश्तीया और घमंड मे बडी बडी हस्तीया डुब जाती है.. अशा शायराना अंदाजातून एकनाथ शिंदेंनी भाषणाला सुरुवात केली. तसेच, बीड, परभणीवरुन राज्यात उपस्थित झालेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावरुन भाष्य केले. तसेच, मला महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये तुरुंगात टाकण्याचे प्रयत्न झाले, तर महाराष्ट्रात २०२५ पर्यत सगळा नक्षलवाद संपणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



राज्यात कायदा सुव्यवस्था प्रश्न आहे म्हणतायत. परंतु, यांच्याकाळात गृहमंत्री अटकेत होता. साधू हत्याकांड देखील यांच्याच काळात झालं आणि ही मंडळी कायदा सुव्यवस्था विषयावर बोलत आहेत. महाविकास आघाडी काळात पोलीस यंत्रणेचा बेसुमार वापर करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील खोट्या केसमधे अडकविण्याचा प्रयत्न झाला. त्यामध् काही मंत्री देखील यात होते. मला देखील अडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला, पुरावा देखील आम्ही सादर केला आहे. सत्तेचा दुरुपयोग कसा केला हे आपल्याला यावरून पहायला मिळालं, असे म्हणत एकनाथ शिंदेंनी महाविकास आघाडी सरकारमधील घडलेल्या घटनांवर भाष्य करत काही गौप्यस्फोटही केले. तसेच, कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलायचा नैतिक अधिकार यांना नाही. आरोप प्रत्यारोपामध्ये आपण गेलो आणि लोकांचे विषय बाजूला पडले.

बीड परभणी प्रकरणात कुणालाही सोडलं जाणार नाही. मी महाविकास आघाडीत होतो, तिथ मला खोट्या गुन्ह्यात अडकवून जेलमधे टाकण्याचा प्लॅन सुरू होता, अंबादास आपल्याला माहिती आहे, किती त्रास झाला ते असा गौप्यस्फोटही एकनाथ शिंदेंनी सभागृहात केला. राज्याचे विधानसभेचे अवर म्हंजे काही गप्पा मारण्याचे ठिकाण नाही. बदलापूर घटनेचा विषय निघाला, त्यावेळी काहींजणांनी रेल्वे ट्रॅकवर जाऊन रेल्वे अडवली. आम्ही आरोपीला फाशी देतो म्हटले. मात्र, पोलिसांनी ज्यावेळी आरोपीचा एन्काऊंटर केला तेव्हा आरोपीच्या बाजूने हे लोक राहिले, असा टोला विरोधकांना लगावला.

मागच्या अधिवेशनात श्वेत पत्रिका उद्योग विभागाची काढली होती. आमच्याकडे हिम्मत होती म्हणून निर्णय घेतला. २ लाख १३ हजार रोजगार निर्मिती राज्यात होणार आहे. राज्यात २ लाख ४३ हजार कोटीची गुंतवणूक राज्यात अली आहे. सव्वा लाख लोकांना संधी मिळाली आहे.

मला नक्षलवाद्यांची धमकी अली होती, मात्र मी डेव्हलपचा मुद्दा समोर ठेऊन काम करत आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्लीत बैठक घेतली होती. आपल्या इकडचे नक्षलवादी छत्तीसगढला पळून जायचे आणि जंगलात लपून रहाचे. कारण, काँग्रेस सरकार त्यांना लपायला मदत करत होते. मात्र, आता तिकडचे सरकार बदलले आहे. त्यामुळे, २०२५ पर्यंत महाराष्ट्रातील सगळा नक्षलवाद संपून जाणार आहे , असेही एकनाथ शिंदेंनी सांगितले.

अगोदरच्या सरकारच्या काळात महाराष्ट्र विकासाच्या मुद्द्यावर तिसऱ्या क्रमांकावर गेले होते. मात्र आता महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आला आहे. औषध खरेदीबाबत आरोप करण्यात आले, दोषींवर आम्ही योग्य कारवाई करू, असेही शिंदेनी म्हटले

# मुख्यमंत्री शिंदेंनी दिलेला शब्द पूर्ण केला, संधीचं सोनं करण्याची जबाबदारी माझी

## कोल्हापुरात जंगी स्वागत होताच मंत्री प्रकाश आबिटकरांची पहिली प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारात कोल्हापूर जिल्ह्यातून मंत्री हसन मुश्रीफ आणि मंत्री प्रकाश आबिटकर यांना संधी मिळाल्यानंतर आज पहिल्यांदाच ते कोल्हापुरात दाखल झाले. कोल्हापुरात आल्यानंतर त्यांनी एकत्रपणे करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीचे दर्शन घेतले. यावेळी माजी खासदार संजय मंडलिक देखील उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केला

यावेळी बोलताना मंत्री प्रकाश आबिटकर यांनी तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केल्याचे सांगत आभार मानले. मला चांगली संधी मिळाली आहे. या संधीचं सोनं करण्याची जबाबदारी माझी असल्याचेही त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादामुळेच शिवसेनेला कोल्हापुरात पहिल्यांदा मंत्रिपद मिळालं. सहा आमदार असताना देखील कोल्हापूरला मंत्रिपद मिळालं नसल्याची खंत मंत्री आबिटकर यांनी व्यक्त केली. मात्र, मुख्यमंत्री शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केला. त्यांनी सांगितले की, कोल्हापूरकरांनी शिवसेनेला भरभरून दिलं आहे. सहा आमदार आणि दोन खासदार दिले. त्या तुलनेनं कोल्हापूरला शिवसेनेनं काहीच दिलं नाही. मात्र, एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूरला मंत्रिपद दिलं. यामुळे कोल्हापुरातील शिवसैनिकांना अधिक बळ मिळणार आहे.



# माझ्याही वडिलांचा खून झाला होता, ती आग वर्णन करु शकत नाही; ओमराजेंनी दिल्लीहून थेट गाठले मस्साजोग

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचा निर्घृणपणे खून करण्यात आल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर राज्यातील वातावरण चांगलचं तापलं आहे.



या घटनेनंतर आज धाराशिवचे खासदार ओम राजे निंबाळकर यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी त्यांच्या वडिलांचा झालेल्या खुनाचा किस्सा देखील माध्यमांसमोर सांगितला.

अशा प्रसंगातून मी देखील गेलो आहे २००६ साली माझ्या वडिलांचा खून झाला होता. पोटात आग काय असते? याचे मी शब्दात वर्णन करु शकत नाही असे ओमराजे म्हणाले.

या घटनेचा करावा तेवढा निषेध कमीच आहे. इतका नीचपणाचा कळस कधी पाहिला नाही. पुरोगामी महाराष्ट्राला हे शोभत नसल्याचे ओमराजे निंबाळकर म्हणाले. नियतीचा खेळ आहे अशा घटनांमधील कुटुंबाचा तळतळाट त्या गुन्हेगारांना परमेश्वर सोडत नाही, त्यांना निश्चित भोगावे लागणार आहे असेही ओमराजे म्हणाले.

गुन्हेगाराला कठोरातील कठोर शिक्षा दिली पाहिजे

यातील गुन्हेगार कितीही जरी मोठा असला तरी शासन नावाच्या यंत्रणेने त्याला शोधून काढून कठोरातील कठोर शिक्षा दिली पाहिजे असे निंबाळकर म्हणाले. माझ्या वडिलांचा देखील २००६ साली खून झाला होता. अद्यापही ते प्रकरण कोर्टात सुरू आहे. या पद्धतीने न्याय मिळणे कठीण असल्याचे ओमराजे निंबाळकर म्हणाले.

वाल्मिक कराड यांच्या नातेवाईकांचा हात असल्याचा आरोप

मंत्री धनंजय मुंडे जवळचे मानले जाणारे वाल्मिक कराड यांच्या नातेवाईकांचा हात असल्याचे आरोप केले जात आहेत. यावरुन आता हिवाळी अधिवेशनात विरोधक चांगलेच आक्रमक झाले आहेत.

वाल्मिक कराड हे परळी नगर परिषदेचे नगराध्यक्ष राहिले आहेत. त्यानंतर गोपीनाथ मुंडे यांच्यापासून बाजूला गेल्यानंतर मागील दहा वर्षांपासून ते मंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील संपूर्ण कारभार पाहत आहेत. धनंजय मुंडे यांच्या अनुपस्थितीत परळी मतदारसंघात वाल्मिक कराड नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अग्रेसर असल्याचं दिसून येतात. यापूर्वी देखील ३०७ सारख्या गुन्ह्यात वाल्मिक कराड यांचा समावेश आढळून आला होता. आता सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात त्यांच्या नातेवाईकांचा संबंध दिसून येत आहे, तर केज पोलीस ठाण्यात वाल्मिक कराड यांच्याविरोधात गुन्हा दाखल आहे. राजकीय आरोप प्रत्यारोपात धनंजय मुंडे यांच्यासह वाल्मिक कराड यांचे देखील नाव वारंवार घेतले जात आहे. संतोष देशमुख खून प्रकरणात विष्णू चाटे हा केज तालुक्यातील आरोपी आहे. जो धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचा निकटवर्तीय मानला जातो.

### गुन्हेगारांना वाचवण्यासाठी सोमनाथ सूर्यवंशींच्या पोस्टमर्टेम रिपोर्टमध्ये बदल? जितेंद्र आव्हाडांचा गंभीर सवाल

**नागपूर/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्याप्रकरणात मंत्री सोबत असेल तर वाल्मिक कराडला अटक करण्याची हिंमत कोण दाखवणार, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी पुन्हा एकदा उपस्थित केला. यावेळी त्यांनी परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी याच्या मृत्यूबाबातही पुन्हा एकदा संशय व्यक्त केला. अंधाराची चिरफाड करून सत्य आले पाहिजे होते. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उत्तरात ते आलेले नाही. परभणीतला सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू कसा झाला? त्याचा रिपोर्ट मी वाचला, त्यात त्याच्या शरीरावर अनेक जखमा होत्या, त्या जखमा आल्या कुठून? हाड मोडल्यामुळे त्याला झटका आलाय. याची उत्तरं कोण देणार? गुन्हेगाराला वाचवण्यासाठी आपण रिपोर्ट बदलत आहोत का, असा सवाल जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला.

यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी ठाणेकरांसाठीच्या डम्पिंग ग्राऊंडच्या मुद्द्यावरुन राज्य सरकारवर हल्ला चढवला. ठाण्यात डम्पिंग ग्राउंड नसल्याने आम्ही जागा शोधत आहोत. ती कुणाची तरी असते अवैधरित्या , तो कचरा सुकला की मग तो जाळला जातो, त्याने धूर तयार होतो. राज्याचे मुख्यमंत्री ठाण्याचे होते पण आम्ही ४० वर्षात डम्पिंग ग्राउंड तयार करू शकलो नाही. प्रदूषण मंडळ झोपले आहे की फक्त वसुली करणे एवढं काम उरलंय. पालिका लक्ष देत नसेल तर सरकारने तरी लक्ष द्यावे. ठाण्यात कचऱ्यात पैसा खाण्याची जी सवय लागलीय ती सुटत नाही. मुख्यमंत्र्यांनी यात लक्ष घालायला हवे. ठाण्याचा डीपी प्लॅन बदलला आहे. ठाण्यातील काही लीगल सोसायटीमध्ये आरक्षण दाखवलं आहे. कळव्यात ४५० इमारती उद्धवस्त करणारा डीपी प्लॅन आहे. ठाण्यात एक मोठा बिल्डर आहे तो आता कळव्यात आहे. त्या बिल्डरने एक बिल्डिंग बांधलीय, त्याला नसलेल्या रस्त्याची परवानगी दिलीय. अख्खं शहर तुम्ही विकत आहात का? या शहरात माणसे राहतात, जनावरं नाही, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली.

# फडणवीस म्हणाले सोबत घेऊन जातो, पण घेऊन जात नाहीत, आश्वासन पाळत नाहीत

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, तुम्हाला ट्रान्सहार्बरवर सोबत घेऊन जातो. सोबत घेऊन जातो म्हणतायत पण घेऊन जात नाहीत, अनेकवेळा आश्वासन पाळत नाहीत'', असं म्हणत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना टोला लगावलाय. ते विधानसभेत बोलत होते. ट्रान्सहार्बर लिंक प्रकल्पावरून जयंत पाटील आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात जुगलबंदी पाहायला मिळाली. इशारो इशारो में काय चाललंय ? सदस्यांकडून विचारणा करण्यात आली आणि सभागृहात एकच हशा पिकला.

जयंत पाटील म्हणाले, राज्यावर ९ लाख कोटींचं कर्ज आहे. महाराष्ट्रात मोठा प्रकल्प यावा अशी इच्छा आहे.

### जयंत पाटील आणि फडणवीसांमध्ये सभागृहात जुगलबंदी

पेट्रोलचे दर शंभर रुपयांच्या वर गेले तरी लोकांना काही फरक पडत नाही, त्यांना सवयच झालीय. मुंबई गोवा महामार्गाचे काम दहा वर्षांपासून रखडले आहे. नितेश राणे आत्ताच मंत्री झालेत त्यांच्याकडून अपेक्षा आहे. फडणवीस म्हणाले होते तुम्हाला ट्रान्सहार्बरवर सोबत घेऊन जातो. सोबत घेऊन जातो म्हणतायत पण घेऊन जात नाहीत, अनेकवेळा आश्वासन पाळत नाहीत.

पत्रकार मंडळी आमचे रात्रंदिवस काम करतात. तुमच्या सर्वांच्या बातम्या देतात. आम्हालाही न्याय देतात. तुम्ही त्यांना १५०० रुपये पेन्शन देणार असं सांगितलं होतं. तुम्ही जी आश्वासन दिली होती. त्याची मी फक्त आठवण करुन देत आहे. २०१४ सालच्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. संभाजीनगर आणि नागपूरमध्ये आयटीपार्क उभारण्याचं आश्वासन दिलं होतं. तेच २०१९ साली देण्यात आलं होतं. आता पुढील काही वर्षात ते पूर्ण होईल, अशी आशा व्यक्त करतो. पुणे-नागपूरमध्ये विमानतळ उभारण्याचं आश्वासन होतं. प्राण जाये मगर वचन ना जाए...या प्रमाणे तुम्ही काम कराल. आता तुम्ही स्वत: आलेला आहात. थोडक्यात आमचा प्रचार चुकीच्या ट्रॅकवर होता.



हे जनतेच्या निर्णयातून स्पष्ट झालेले आहे.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, अनेक संकल्प पूर्ण झालेली नाही. २०१९ मध्ये १ कोटी रोजगार निर्माण करु म्हटले होते. आता २५ लाख रोजगार निर्माण करण्याचे आश्वासन दिले आहे. आम्ही महिलांच्या अत्याचारावर प्रचार केला. शेतकऱ्यांच्या समस्यांवर प्रचार केला. आमचा ट्रॅक चुकीचा होता. कारण जनतेने त्याबाबत निर्णय दिलेला आहे. माझी सूचना एवढीच आहे की, आजपासून एक अकाऊंट ठेवावे. किती लोकांना रोजगार मिळावा, याबाबतची आकडेवारी ठेवावी.

## विविध वृत्त...

### मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे मंत्री ड.आकाश फुंडकर हे रविवारी दि. २२ नोव्हेंबर रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.



त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दुपारी १ वाजता शेगाव येथे आगमन व मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळ आयोजित १७ वा उप वधु वर महोत्सव नव्या नात्यांचा या कार्यक्रमास उपस्थिती, दुपारी १.३० वा. श्री संत गजानन महाराज मंदिर, शेगाव येथे आगमन व दर्शन, दुपारी २.३० वा. ते ३.४५ वा. श्री संत गजानन महाराज मंदिरा समोरील परिसर, शेगाव येथे आयोजित सत्कार समारंभास उपस्थिती, दुपारी ४.०० वा. श्री सिध्दीविनायक टेक्नीकल कॅम्पसकडे प्रयाण व स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्या समाधीस्थळी आगमन व दर्शन, दुपारी ४.१५ वा. श्री सिध्दीविनायक टेक्नीकल कॅम्पस येथून खामगावकडे प्रयाण, दुपारी ४.३० वा. खामगाव येथे आयोजित सत्कार समारंभास उपस्थिती, त्यानंतर सोईनुसार 'वसुंधरा' निवासस्थान, खामगावकडे प्रयाण करतील. ००००

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ खामगावात आंदोलन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल केलेल्या वक्तव्याचे पडसाद राज्यात ठिकठिकाणी उमटताना दिसून येत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या निषेधार्थ आज बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सर्व आंबेडकरी अनुयायी व विविध पक्षांच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी अमित शहांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा जाणून-बुजून अपमान केला आहे. त्यांनी तातडीने राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे.



# माकडाच्या टोळीमुळे ढाणकी नागरिकांत भीती!; वनविभाग खात बनलं नाममात्र!

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** ढाणकी गावात मागील कित्येक महिन्यापासून माकडाने बस्थान मांडले आहे. दिवसभर माकड गावात उड्या मारत फिरत असल्याने लहान -मोठया मध्ये भीती पसरली आहे. ढाणकी गावात बस्थान मांडून बसलेले हे माकड गावात एका घराच्या छपरावरून दुसऱ्या घरावर उडी मारणे, रस्त्याने जाणारे नागरिक व लहान मुले यांच्यावर चेतावळून जाणे,वस्तू पळविणे, रस्त्यावरून जाताना अंगावर धावून येणे. यामुळे लहान मुलांसोबतच नागरिकांमध्ये भीती पसरली असून, वनविभागाने वानराचा बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

**ढाणकी गावात माकडाची टोळी असून त्यांनी कन्याशाळा ते तलाठी कार्यालय व शासकीय दवाखाना या परिसरात आपला बस्थान मांडला आहे. या परिसरात लोकांची गर्दी जास्त राहते, वन विभाग यांनी याची दक्षता घेऊन या माकडाच्या टोळीने कोणाचा घात करण्या अगोदर रेस्क्यू करून या माकडाचा बंदोबस्त करावा अशी मागणी जोर धरत आहे.**



## वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर शाळांच्या वेळेत बदल करण्याची मागणी पालकांची प्रशासनाकडे मागणी



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहरासह जिल्ह्यात एकीकडे तापमानात मोठ्या प्रमाणावर घट होत असताना कडाक्याच्या थंडीत वाढ झाली आहे, या कडाक्याच्या थंडीत नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असताना दुसरीकडे मात्र प्राथमिक शाळांच्या वेळेत कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. शाळांच्या नियमाप्रमाणे सकाळी साडेसात वाजताच शाळा भरत असल्याने ऐन कडाक्याच्या थंडीत सुद्धा विद्यार्थ्यांना सकाळीच घराबाहेर पडून शाळेत यावे लागत आहे.

वाढत्या थंडीच्या पार्श्र्वभूमीवर शाळांच्या वेळेत बदल करण्याची मागणी पालकांकडून केली जात आहे. धुळे शहरासह जिल्ह्याचे तापमान चार अंशावर आले असून वाढत्या थंडीच्या पार्श्र्वभूमीवर शाळा प्रशासनाने शाळेच्या वेळेत बदल करण्याबाबत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी पालकांमधून व्यक्त होत आहे.

सध्या राज्यामध्ये थंडीची लाट पसरली असून उत्तर महाराष्ट्रात याचा अधिक परिणाम बघायला मिळत आहे धुळे जिल्ह्यात गेल्या आठवड्याभरापासून थंडीचे तापमान हे चार अंशावर आले असून कडाक्याच्या थंडीमध्ये विद्यार्थ्यांना सकाळच्या सत्रात लवकर उठून शाळेत जाण्याची वेळ आली आहे. अशात पालकांनी विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन बालरोग तज्ञ डॉ अभिनय दरवडे यांनी केले आहे. तसेच शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांची खबरदारी म्हणून शाळेमध्ये बदल करावा अशी देखील मागणी त्यांनी यावेळी केली आहे.

## धुळे शहर वाहतूक शाखेची धडक कारवाई; वाहन चालवणाऱ्या अल्पवयीन मुलांवर उगारला कारवाईचा बडगा



**धुळे/प्रतिनिधी :** धुळे शहर वाहतूक शाखेने आज अचानक कारवाई सुरू केली असून शहरात गेल्या अनेक दिवसांपासून बुलेट वाहनांना कर्णकर्कश सायलेन्सर बसवणाऱ्यांच्या तक्रारीत वाढ झाली होती. या तक्रारींची दखल घेऊन शहर वाहतूक शाखेने धडक कारवाई सुरू केली असून शहराच्या विविध भागात बुलेट वाहन चालकांवर कारवाई करण्यात येत आहे.



तसेच वाहन परवानां नसणाऱ्या आणि अल्पवयीन असणाऱ्या मुलांवर देखील कठोर कारवाई करण्यात येत असून जप्त करण्यात आलेली वाहने शहर वाहतूक शाखेच्या कार्यालयात लावण्यात आली आहे.. वाहन चालवणाऱ्या अल्पवयीन मुलांच्या पालकांना बोलवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक भूषण कोते यांनी दिली.

## फडणवीस तुम्ही म्हणता वाल्मिक कराड गायब आहे, मग हे काय? अंजली दमानियांकडून थेट सवाल

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यामधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचा अत्यंत निकटवर्तीय वाल्मिक कराडचे नाव आल्यानंतर आरोपांची फैरी झडत आहेत. वाल्मिक कराडवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात निवेदन सादर करत कोणालाही सोडणार नसल्याचे म्हटले आहे. बीड जिल्हा पोलिस अधीक्षकांची सुद्धा उचलबांगडी करण्यात आली आहे. तथापि, वाल्मिक कराडवर अजूनही कारवाई झाली नसल्याने बीड जिल्ह्यात संताप आहे. आमदार संदीप क्षीरसागर यांनी वाल्मिक कराडला अटक करण्याची मागणी केली आहे.

फडणवीस तुम्ही म्हणता वाल्मिक कराड गायब आहे, मग हे काय?



दरम्यान, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी वाल्मिक कराडवरून सरकारवर गंभीर आरोप केला आहे. वाल्मिक कराड नागपुरात फार्म हाऊसवर आहे, मी पत्ता देतो पोलीस त्याला पकडत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, हाच धागा पकडत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट सवाल केला आहे. फडणवीस तुम्ही म्हणता वाल्मिक कराड गायब आहे , मग हे काय? अशी विचारणा त्यांनी ट्विट करून केली आहे. अंजली दमानिया यांनी वाल्मिक कराडला तातडीने अटक झालीच पाहिजे. अटक नाही झाली तर आम्ही सगळे बीडला जाऊन आंदोलन करणार. धनंजय मुंडे यांना देखील कुठलेही खाते मिळता कामा नये, अशी मागणी ट्विट करून केली आहे.

# दत्त जयंतीनिमित्त दीपमाळ प्रकाशमय करून पूजा संपन्न

### चर्मकार समाजाने भावी भक्तांसाठी ठेवला होता भोजनाचा कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** चर्मकार समाजाने नेहमी समाजाला प्रकाश देण्याचे काम केले आहे. त्यांना पेशवाईच्या काळात राजा महाराजांनी चर्मकार समाजाकडे गावातील सण आणि उत्सव मध्ये मंदिरात निवद देण्यासाठी लोकांना अंधारात रस्ता दाखवण्यासाठी दिवटी घेऊन जाण्याची जीमेदारी दिली जात होती असं जुन्या लोकांनकडून बोल्या जाते.



प्राचीन काळात दीपमाळ अस्तित्वात येण्याआधी मंदिर प्रांगणात उंच जागी दिवे लावण्याची प्रथा अस्तित्वात होती. मंदिरासमोर दीपमाळा बांधणे हे पुण्यकृत समजले जाई. ती बांधण्यासाठी मजबूत दगडी खांब उभारून त्यावर कापूर; तसेच, अन्य ज्वालाग्राही द्रव पदार्थांच्या साहाय्याने दीप प्रज्वलित करून मंदिर परिसर प्रकाशमय करण्याचा हेतू राहत असे. म्हणूनच की काय? ढाणकीतील चर्मकार समाज दत्त मंदिर समोरील दीपमाळाची पूजा करून ते प्रकाश मय करतात.

तेच परंपरा ढाणकीतील चर्मकार समाजाने जिवंत ठेवली आहे. आज जवळ पास ९० वर्ष झाले असून त्यांची १०वी पिढी ही दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा चर्मकार समाजाची जुनी परंपरा निरंतर ठेवत.

दत्त जयंती निमित्त ढाणकी येथील टेंबेश्र्वर नगर येथील दत्त मंदिर जवळील दीप माळ जवळ सर्वात पहिले जगद्गुरु संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांचे पूजन करून भावी भक्तांनसाठी भोजनाचे आयोजन केले होते . दत्त जयंती निमित्त यात्रा भरत असताना हजारो च्या संख्येने भावी भक्त येत असतात. म्हणून त्यांनी यात्रेत यावेळेस जगद्गुरु संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या शिकवणी नुसार समाजात प्रकाश देण्याचे काम करत मंदिर परिसरातील दीपमाळ इलेक्ट्रिक दिव्यानी सजवून प्रकाशमय करून टाकले.

यावेळी चर्मकार समाज ढाणकी अध्यक्ष संजय परतूडे, उप अध्यक्ष बालाजी पाचकोरे, सचिव विष्णू सुरोशे, रमेश गायकवाड,शिवनंदा गायकवाड,अंजली परतूडे, महानंदा पाचकोरे, सीमा सुरोशे, पूजा सुरोशे, दत्ता कांबळे, गणेश सुरोशे आणि अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद चे ढाणकी शहर अध्यक्ष गजानन सुरोशे,देवराव डोंगरे आणि पूर्ण चर्मकार समाज उपस्थित होता.

